# प्रेसनोट

दि.२२/०९/२०२०

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोपरगांव शहर पो.स्टे.,जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | विलास चिमाजी कुसाळकर, वय ५२ वर्ष, भांडारपाल (स्टोअरकिपर), वर्ग ३, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.), ता.कोपरगांव, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ३०,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ३०,०००/— |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांचे सासरे हे ऑगस्ट २०१८ मध्ये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.), कोपरगांव येथुन भांडारपाल (स्टोअरकिपर) या पदावरुन सेवानिवृत्त झाले होते. त्यांनी भांडारगृहाचा चार्ज देताना काही वस्तु कमी असल्याचे कारण सांगुन त्यांचे सेवानिवृत्ती नंतर नियमानुसार मिळणारे आर्थिक लाभ, पेन्शन, सातवे वेतन आयोगाचा फरक रोखुन धरण्यात आले होते. तक्रारदार यांनी त्यांचे सासरे यांचेसह यातील आरोपी लोकसेवक विलास चिमाजी कुसाळकर, भांडारपाल, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.), ता.कोपरगांव, जि.अहमदनगर यांची भेट घेतली असता त्यांनी गहाळ वस्तू बाहेरुन खरेदी करुन आणुन व ५०,०००/— रुपये दिल्यास त्यांचा चार्ज क्लिअर करुन वरिष्ठांना तसे प्रमाणपत्र देतो असे सांगितले. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, अहमदनगर यांचेकडे दिलेल्या तक्रारीवरुन दि. १८/९/२०२० रोजी कोपरगांव औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.), कार्यालयात आयोजित लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक कुसाळकर यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष ३०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन, स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर आज दि.२२/९/२०२० रोजी पुणतांबा चौफुली येथील हॉटेल आनंद परमीटरुम समोर आयोजित लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक कुसाळकर यांनी तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष ३०,०००/— रुपयांची लाच स्वीकारली असता आरोपी लोकसेवक कुसाळकर यांना रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in

ई—मेल :— acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :— १०६४

दुरध्वनी क्रमांक :— ०२४१—२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:— ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर